

# ३९ वी नाथ पै एकांकिका स्पर्धा जाहीर

गेल्या ३८ वर्षात विविध प्रयोग करुन गतवर्षीपासून पुन्हा खुली केलेली एकांकिका स्पर्धा जाहीर करण्यात आली आहे. स्पर्धा यावर्षी शनिवार व रविवार २४ व २५ डिसेंबर २०१६ या दोन दिवसात संपूर्ण दिवस घेण्यात येणार आहे. स्पर्धा शालेय व खुला गट अशा दोन गटात घेण्यात येणार असून स्पर्धेच्या प्रवेश अर्जासाठी १० डिसेंबर २०१६ ही अखेरची तारीख आहे. स्पर्धेत शालेय गटासाठी रु. ५०००, ३००० व २००० ची तर खुल्या गटासाठी रु. १५०००, १०००० व ७००० अशी तीन रोख बक्षिसे आहेत. शिवाय दिग्दर्शन, अभिनय व इतर गोष्टींसाठीही रोख पारीतोषिके व स्मृतिचिन्हे देण्यात येणार आहेत. स्पर्धा प्रवेश किंवा इतर माहितीसाठी भ्रमणध्वनी क्रमांक ९४२२५८४०५४ व ९४२२३९३७१२ वर संपर्क साधावा. स्पर्धेचा प्रवेश अर्ज संस्थेच्या www.acharekarpratishthan.in वेबसाईटवर उपलब्ध आहे. स्पर्धेत शालेय गटात १० संघाना तर खुल्या गटात १५ संघांनाच प्रवेश देण्यात येईल.

## नाथ पै एकांकिका स्पर्धा **प्रवेश अर्ज** खुला / शालेय गट

**वसंतराव आचरेकर सांस्कृतिक प्रतिष्ठान कणकवली**

नोंदणी क्र. एफ-१२५ - (सिंधुदुर्ग)

**सन २०१६ - वर्ष ३९ वे**

**मा. कार्याध्यक्ष, वसंतराव आचरेकर सांस्कृतिक प्रतिष्ठान, कणकवली**

***सप्रेम नमस्कार,***

नाथ पै एकांकिका स्पर्धेत भाग घेण्यासाठी आमचा स्पर्धक संघ पाठवीत आहोत. त्यासंबंधीची माहिती पुढे दिलेल्या फॉर्मवर भरलेली आहे. स्पर्धेचे प्रवेश शुल्क रु. ५००/- अर्जासोबत समक्ष रोख / डिमांड ड्राफ्टने पाठवित आहोत.

१. स्पर्धक संघाचे नांव : ______________________________

______________________________

२. एकांकिकेचे नांव : ______________________________

३. लेखकाचे नांव : ______________________________

४. दिग्दर्शकाचे नांव : ______________________________

५. सेन्सॉर सर्टिफिकेट क्र.: ______________________________

६. पत्रव्यवहाराचा पत्ता : ______________________________

______________________________

______________________________

☎ | | | | | | | | |

७. संघ व्यवस्थापकाचे नाव : ______________________________

भ्रमणध्वनी | | | | | | | | | |

- स्पर्धेचे सर्व नियम, अटी आम्ही वाचल्या आहेत आणि त्या आम्हाला समजल्या असून आम्हाला मान्य व आमचेवर बंधनकारक आहेत.
- स्पर्धेच्या परीक्षक मंडळाकडून दिला जाणार निकाल आम्हाला बंधनकारक आहे.
- शालेय गटातील वरील सर्व मुले आमच्या शाळेत पहिली ते दहावी इयत्तेमध्येच शिकत आहेत.

**तारीख –**

**मुख्याध्यापक / अध्यक्ष**

(रबर स्टँप वापरावा)

## नियमावली

१. शालेय गटात इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांस भाग घेता येईल.

२. शालेय गटाच्या प्रवेशासाठी निव्वळ बालगटासाठी लिहिल्या गेलेल्या एकांकिकानाच प्रवेश देण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

३. खुल्या गटात उच्च माध्यमिक शाळा, महाविद्यालये, प्रशिक्षण संस्था व नाट्य संस्था अंतर्भूत केल्या आहेत.

४. खुल्या गटात भाग घेणाऱ्या महाविद्यालयाच्या संघात बहिस्थ म्हणून परीक्षेस बसू इच्छिणारा विद्यार्थी स्पर्धेस पात्र ठरणार नाही.

५. प्रत्येक विद्यालयास/महाविद्यालयास, नाट्यसंस्थेस जास्तीत जास्त दोन संघ स्पर्धेसाठी पाठविता येतील मात्र प्रत्येक संघासाठी स्वतंत्र (वेगवेगळे) प्रवेश शुल्क व प्रवेश अर्ज सादर करावे लागतील.

६. या स्पर्धेसाठी फक्त मराठी एकांकिका सादर करता येतील.

७. प्रवेश अर्जासोबत प्रवेश शुल्क रु. ५००/- व एकांकिकेच्या २ सुवाच्य प्रती पाठविणे आवश्यक आहे. प्रवेश शुल्क कोणत्याही सबबीबर परत केले जाणार नाही.

८. एकांकिकेचा प्रयोग सादर करण्यापूर्वी लेखकाची आगाऊ परवानगी संबंधित स्पर्धक संघाने घेणे जरुरीचे व बंधनकारक आहे. परवानगी पत्राची साक्षांकित प्रत प्रवेश अर्जासोबत जोडावी. संबधित लेखकाच्या परवानगीबाबत कोणत्याही प्रकारच्या तक्रारी किंवा भरपाईस स्पर्धा आयोजक संस्था जबाबदार रहाणार नाही.

९. एकांकिका सेन्सॉर संमत असावी आणि सेन्सॉर सर्टिफिकेट क्रमांक प्रवेश अर्जात नमूद करावा.

१०. दिलेली वेळ व दिलेल्या दिवशी आपली एकांकिका सादर करणे प्रत्येक संघाला बंधनकारक आहे.

११. प्रवेश अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख १० डिसेंबर २०१६ राहील

१२. शालेय व खुल्या दोन्ही गटांतील संघांना ६० मिनिटांचा अवधी दिला जाईल. या ६० मिनिटांमध्ये सर्व तांत्रिक बाबींची पूर्तता, प्रत्यक्ष एकांकिका सादरीकरण व तद्नंतर सर्व तांत्रिक बाबी रंगमंचावरुन हलवून रंगमंच मोकळा करुन आयोजकांच्या ताब्यात देणे याचा समावेश असेल. आपल्या अगोदर होणारी एकांकिका संपल्यानंतर स्टेज पूर्ण रिकामे केले जाऊन पडदा उघडून स्टेज पूर्ण रिकामे असल्याचे प्रेक्षकांना दाखविले जाईल व पुन्हा पडदा स्टॉप वॉच चालू करुन ६० मिनिटांचा अवधी मोजला जाईल. स्टॉप वॉच सुरु केल्यानंतर संघ व्यवस्थापकाची सही घेतली जाईल व एकांकिका संपताच झालेल्या कालावधीची नोंद करुन पुन्हा सही घेतली जाईल. ६० मिनिटांपेक्षा जादा अवधी झाल्यास एकांकिका स्पर्धेतून बाद होईल. सदर नियम प्रत्येक दिवसाच्या पहिल्या एकांकिकेलाही लागू आहे.

१३. एकांकिकेच्या प्रयोगासाठी एखादे टेबल, खुर्ची, टीपॉय, उपलब्ध लेव्हलस् असे किरकोळ फर्निचर पुरविण्यात येईल. इतर विशेष नेपथ्याची सोय स्पर्धक संघाने स्वत: करावयाची आहे.

१४. ८ स्पॉट व ६ चॅनेलचा टेबलटॉप पल्सर उपलब्ध असेल व त्यासाठी कोणतेही भाडे आकारले जाणार नाही. याशिवाय जादा ७ स्पॉट उपलब्ध असतील मात्र त्यासाठी प्रत्येकी रु. १००/- एवढे भाडे आकारले जाईल.

१५. विजेत्या संघानी व स्पर्धकांनी स्मृतिचिन्हे व रोख पारितोषिके व प्रमाणपत्रे पारितोषिक वितरण समारंभात उपस्थित राहून स्वीकारण्याची आहेत. एखाद्या संघाची खरोखरच अडचण असल्यास त्या संघाची प्रमाणपत्रे पोस्टाने पाठविण्यात येतील. स्मृतिचिन्हे व रोख पारितोषिके प्रत्यक्ष येऊन घेऊन जावयाची आहेत. ती कोणत्याही सबबीवर पाठविली जाणार नाहीत.

१६. एकांकिका किमान ३० मिनीटे व कमाल ४० मिनीटांची असावी.

१७. रंगभूषा ज्या त्या संघाने स्वत: करावयाची आहे.

१८. स्पर्धेचा कार्यक्रम जाहीर झाल्यावर एकांकिका बदल स्वीकारला जाणार नाही.

१९. स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ स्पर्धेच्या शेवटच्या दिवशी संपन्न होईल.

२०. परिक्षक मंडळाचा निर्णय अंतिम समजण्यात येईल व तो सर्व स्पर्धक व स्पर्धक संस्था यांच्यावर बंधनकारक राहील.

२१. स्पर्धेचा निकाल स्वतंत्रपणे सर्व संघाना कळविण्यात येईल.

२२. या स्पर्धेबाबत संपर्क ◆ कार्यवाह, वसंतराव आचरेकर सांस्कृतिक प्रतिष्ठान, द्वारा - स्टेटस् फूटवेअर, मुंबई गोवा हायवे, कणकवली-४१६६०२, जि. सिंधुदुर्ग. आणि भ्रमणध्वनी - ९४२२५८४०५४ वर करावा.

२३. वरील नियमात व आयोजनात पूर्वसूचनेशिवाय बदल करण्याचा संपूर्ण अधिकार कार्याध्यक्ष, वसंतराव आचरेकर सांस्कृतिक प्रतिष्ठान, कणकवली हे राखून ठेवीत आहेत.